## अर्पण पत्रिका

आई, तू मला आईची उणीव कधीच जाणवू दिली नाहीस.

सर्वांना भोळा-भावडा जीव लावलास.

नावाप्रमाणेच तू अनसूया होतीस.

आई, तुलाच सादर अर्पण

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, माधवी राजाराम देसाई यांनी ''कवी ग्रेस यांची कविता : स्वरूपशोध ('संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहांच्या अनुषंगाने)'' या प्रबंधिकेचे संशोधनकार्य समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

माधवी देसाई यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या ही प्रबंधिका लिहिली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरची प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्.(मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

कोल्हापूर
दि.

डॉ.रवींद्र ठाकूर
मार्गदर्शक

## प्रतिज्ञापत्र

"'कवी ग्रेस यांची कविता : स्वरूपशोध ('संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहांच्या अनुषंगाने)" या विषयावरील सदरची शोधप्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्.(मराठी) पदवी परीक्षेसाठी मी स्वतः लिहिलेली असून ती पूर्णपणे स्वतंत्र आहे. ही शोधप्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

Madhavi Desai

कोल्हापूर

दि. २८-६-2002.

**माधवी देसाई**

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. पदवीसाठी विषयनिश्चितीची चर्चा गुरुवर्य ठाकूर सरांशी करतानाच त्यांच्याकडून अचानक व अनपेक्षितपणे कवी ग्रेस यांचा विषय निघाला. कवी ग्रेस यांच्या कवितांचा अभ्यास करणे हे एक आव्हानच होते. ते पेलणे आणि पूर्ण करणे यासाठी लागणारी माझ्या मनाची तयारी आणि विचारांची दिशा निश्चित करण्याचे काम डॉ.रवींद्र ठाकूर सरांनी केले. श्री ठाकूर सरांनी मार्गदर्शक म्हणून मला जे मार्गदर्शन केले आहे ते माझ्या लेखी खूप उच्च दर्जाचे आहे. सरांनी वेळोवेळी चर्चा करताना मला बारीक तपशीलही समजावून दिले. प्रबंध अधिकाधिक अर्थपूर्ण व नेमका होण्यासाठी त्यांनी महत्त्वाच्या सूचना केल्या. त्या मला या अभ्यासात उपयुक्त ठरल्याच पण त्या मला पुढील अभ्यासात आणि आयुष्यात मोलाच्या ठरणाऱ्या आहेत. डॉ.ठाकूर सरांची मी शतशः ऋणी आहे.

ग्रेस यांच्या कविता मी अभ्यासासाठी निवडल्या नंतर मात्र त्या विषयाचा माझ्यावर ताण आला. हा ताण प्रथमतः सैल केला तो रास्ते सरांनी ! त्यांनी या प्रबंधासाठी मदत केली नसती तर माझी शोधप्रबंधिका कधीच पूर्ण झाली नसती. रास्तेसर म्हणजे संदर्भग्रंथाची चालती-बोलती ‘Information Technology’ आहे. कोणताही संदर्भ विचारला, की तो शोधण्यासाठी चाललेली त्यांच्या पावलांची लगबग इतकी मधुर असते की, अभ्यास आणि संशोधन करण्याचा अधिक उत्साह येतो. रास्तेसरांबद्दल मनात आदर आणि कृतज्ञता जपून त्यांच्या ऋणातच राहणे माझ्यासाठी आनंददायी आहे.

प्रबंध-लेखनासाठी अरुण पाटील यांनी जो तगादा लावला तो मला प्रबंध पूर्ण करण्यासाठी साह्यभूत ठरला. अरुण पाटील सरांनी माझ्या संशोधनासाठी अपरिमित श्रम घेतले आहेत. त्यांचे ऋण मी कसे फेडू ? माझ्या प्रबंधलेखनाविषयी त्यांना वाटणारी तळमळ मी शब्दात वर्णन करू शकत नाही.

हा प्रबंध पूर्ण करण्यास मला माझी कन्या डॉ.कु .कुंती हिने केलेली मदत अविस्मरणीय आहे. तिने मला माझ्या कौटुंबिककामातून सुटका दिली आणि प्रबंध लेखनास वेळ उपलब्ध करुन दिला. तिचे सहकार्य कौतुकास्पद आहे.

माझे पती श्री राजाराम यांनी प्रबंध लेखनासाठी केलेल्या सहकार्यातून त्यांच्या मोठया मनाचेच दर्शन घडते. श्री.जयवंत देशमुख, माझी कन्या कु.प्राजक्ता, श्री.मुकुंद पुजारी सर, चि.अनिकेत या सर्वांची आपुलकी मला प्रबंधलेखनास उभारी देणारी

ठरली.

ग्रेस यांच्या कवितांचा आणि वाङ्मयीन दृष्टीचा मागोवा घेण्यासाठी मला कमल देसाई यांनी जी मदत केली आणि उत्तम मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांची शतशः ऋणी आहे. त्यांचा प्रेमळ सहवासही आनंददायी आणि संस्मरणीय असाच आहे.

प्रबंधिकेच्या लेखनकाळात कवी ग्रेस यांनी मला दोनवेळा फोन करून माझ्या संशोधनाची आस्थेने विचारपूस केली त्यामुळे मला अधिक प्रोत्साहन मिळाले.

या प्रबंधिकेचे संगणकीय मुद्रण श्री.मिलिंद भोसले यांनी मनापासून व उत्तमप्रतीचे केले आहे त्याबद्दल त्यांचेही आभार मानणे माझे कर्तव्यच ठरते.

**माधवी देसाई**